# MPSC

# प्रचलित घडामोडी

## *स्पेशल कोर्स (मराठी)*




Headlines: ८ ते १२ जानेवारी २०२०

१३ जानेवारी २०२०

# हेडलाईन्स

## अमेरिका–इराण तणाव

- अमेरिकेने इराकची राजधानी बगदाद येथे केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात इराणचा सर्वोच्च कमांडर कासिम सुलेमानी मारला गेल्यामुळे इराण व अमेरिकेत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

**तणावाची पार्श्वभूमी :**

- 1953 मध्ये मोहम्मद मोसालीक हे लोकशाही मार्गाने इराणमध्ये सत्तेवर आले त्यांनी तेल उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करण्याचे धोरण अवलंबिले जे अमेरिकेस अमान्य होते.
- अमेरिकेने त्यांना धार्जिणे शहा रजा बहलवी यांना 1979 मध्ये सत्तेत आणले परंतु त्यांना मोठा विरोध झाला आणि 1979 मध्ये इराणला रिपब्लिक ऑफ इराण असे घोषित केले.
- 1988 मध्ये अमेरीकेने इराणचे मक्केला जाणारे प्रवासी विमान पाडले ज्यात 290 प्रवासी ठार झाले.
- 2000च्या दशकात इराण अणुकार्यक्रम राबवत असल्याच्या कारणावरून युनो, युरोपियन संघ व अमेरिका यांनी इराणवर अनेक प्रकारचे निर्बंध लादले.
- 2015 : P5 +1 (अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, चीन, रशिया ) या सहा देशांच्या गटाने इराणशी अणुकरार केला मात्र ट्रम्प सत्तेत आल्यावर त्यांनी करातून माघार घेतली यातून मोठ्या प्रमाणावर तणाव निर्माण झाला.
- इराण मोठा तेल उत्पादक देश आहे इराणवर खनिज तेल विक्री वरूनही मोठा आंतरराष्ट्रीय दबाव आहे.

**इराण विषयी :**

**भौगोलिक स्थान**

- पूर्वेकडे – पाकिस्तान अफगाणिस्तान
- उत्तरेला – तुर्कमेनिस्तान व कॅस्पियन समुद्र
- पश्चिमेला – अझर बैजान व इराक
- दक्षिणेकडे – ओमानचा समुद्र
- जुने नाव : पर्शिया
- राजधानी : तेहरान
- राष्ट्रीय भाषा : पर्शियन
- चलन : इराणी रियाल
- क्षेत्रफळ : सुमारे 16 लाख चौ.किमी
- लोकसंख्या : सुमारे 8 कोटी
- राष्ट्राध्यक्ष : हसन रूहानी

**महत्त्वाचे :**

- इराण हा आशिया खंडातील मध्यपूर्वेतील देश आहे.
- हा एक शियाबहुल इस्लामी देश आहे. या देशात असणारी पर्शियन संस्कृती जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे.
- या देशाचा खनिज तेल साठ्यात जगात तिसरा तर नैसर्गिक वायू साठ्यात दुसरा क्रमांक लागतो.
- इराणचे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन हे खनिज तेल आहे तसेच येथे केशराचे उत्पादनही घेतले जाते.
- भारत इराण मधून मोठ्या प्रमाणावर खनिज तेल आयात करतो.
- भारताने मध्यपूर्व आशियाशी संपर्क प्रस्थापित करण्यासाठी इराणमध्ये चाबहार बंदर विकसित केले आहे.

## ग्लोबल इकॉनॉमिक प्रॉस्पेक्ट्स् 2019

- जागतिक बँकेने प्रकाशित केलेल्या सदर अहवालानुसार जगाची आर्थिक वाढ येणाऱ्या वर्षांमध्ये 2.5 टक्क्यांनी वाढेल.
- दक्षिण आशियामध्ये 5.5 टक्क्यांनी आर्थिक वाढ होण्याचे भाकित अहवालात करण्यात आले आहे.
- 2020 मध्ये भारतीय अर्थव्यवस्था 5 टक्क्यांनी वाढेल. तर त्यापुढील वर्षांमध्ये 5.5 टक्क्यांनी वाढेल.

**जागतिक बँक :**

- दुसऱ्या महायुद्धानंतर उद्ध्वस्त झालेल्या युरोप आणि आशियातील देशांच्या पुनर्बांधणीसाठी आणि विकासासाठी IBRD (इंटरनॅशनल बँक फोर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट) ची स्थापना 1944 मध्ये ब्रेटनवूड परिषदेमध्ये करण्यात आली. आंतरराष्ट्रीय विकास संघटना (IDA) ची स्थापना 1960 मध्ये झाली. या दोन संस्थांना मिळून जागतिक बँक असे म्हणतात.

त्यानंतर इतर तीन संस्था या दोन संस्थांसोबत संलग्न

झाल्या आणि या पाचही संस्थांना जागतिक बँक गट असे म्हणतात.

**त्या इतर 3 संस्था:**

| अ. नं. | स्थापना | बँक | उद्दिष्टे |
|---|---|---|---|
| 1. | 1956 | IFC इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन | विविध देशातील खाजगी उद्योगांना वित्तीय मदत करते |
| 2. | 1988 | MIGA मल्टीलॅटरल इन्व्हेस्टमेंट गॅरंटी एजन्सी | गुंतवणूकदार देशांना जोखमेबाबत मार्गदर्शन करते. |
| 3. | 1966 | ICSID इंटरनॅशनल सेंटर फोर सेटलमेंट ऑफ इन्व्हेस्टमेंट डिसप्युट्स् | सदस्य देशातील वादांचा निपटारा भारत या बँकेचा सदस्य नाही. |

**जागतिक बँकेची प्रकाशने :**

- वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट आणि ग्लोबल इकॉनॉमिक प्रोस्पेक्ट्स

## ग्लोबल पासपोर्ट पॉवर रँकमध्ये भारत 84व्या स्थानी

- इंटरनॅशनल एअर ट्रान्स्पोर्ट असोसिएशनच्या आकडेवारीनुसार, सामर्थ्यशाली पासपोर्टच्या यादीत भारत जगात 84 व्या स्थानी आहे.
- यंदा भारताच्या क्रमवारीत दोन स्थानांनी घसरण झाली.
- व्हिसाशिवाय पासपोर्ट धारकाला किती देशांमध्ये प्रवेश मिळतो या आधारावर ही क्रमवारी ठरवली जाते.

  अफगाणिस्तान या यादीत सर्वात शेवटी आहे.

**महत्त्वाचे :**

- भारतीय पासपोर्ट धारकांना भूतान, कंबोडिया, इंडोनेशिया, श्रीलंका, म्यानमार, झिंबाम्बे इ. 58 देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवेश मिळतो.
- जगातील 10 सर्वात शक्तिशाली पासपोर्ट (व्हिसाशिवाय प्रवेश मिळणाऱ्या देशांची संख्या कंसात) :

1. जपान : 191 देश
2. सिंगापूर : 190 देश
3. जर्मनी आणि दक्षिण कोरिया : 189 देश
4. फिनलँड आणि इटली : 188 देश
5. डेन्मार्क, लक्समबर्ग आणि स्पेन : 177 देश
6. फ्रान्स आणि स्वीडन : 186 देश
7. ऑस्ट्रिया, आयर्लंड, नेदरलँड्स, पोर्तुगाल आणि स्वित्झर्लंड : 185 देश
8. बेल्जियम, ग्रीस, नॉर्वे, यूके आणि यूएसए : 144 देश
9. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, झेक प्रजासत्ताक, माल्टा आणि न्यूझीलंड : 183 देश
10. हंगेरी, लिथुआनिया आणि स्लोव्हाकिया : 181 देश

## कर्नाटकाच्या छल्लाकेरेमध्ये अंतराळवीरांसाठी ISRO चे प्रशिक्षण केंद्र

- अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था कर्नाटक राज्यातल्या छल्लाकेरे या गावाजवळ जागतिक दर्जाची सुविधा देणार एक प्रशिक्षण केंद्र उभारणार आहे.
- कर्नाटकातल्या चित्रदुर्गा जिल्ह्यात छल्लाकेरे या गावाजवळ हे केंद्र उभारले जाईल. या केंद्रामध्ये अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे.
- तेथे 'योंग ह्यूमन स्पेस फ्लाइट सेंटर' देखील तयार केले जाणार.
- गगनयान अभियानासाठी भारतीय अंतराळवीरांना रशियामध्ये प्रशिक्षण दिले जात आहे.

**ISRO विषयी :**

- भारत सरकारची प्रमुख अंतराळ संस्था
- स्थापना :15 ऑगस्ट 1969
- मुख्यालय : बेंगळूरू
- 1962 साली स्थापना झालेल्या इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च (INCOSPAR) या संस्थेची जागा ISRO ने घेतली.
- संस्था विज्ञान विभागाकडून व्यवस्थापित केली जाते.
- ISRO चा पहिला उपग्रह : आर्यभट्ट (19 एप्रिल

1975 रोजी सोव्हिएत युनियनने प्रक्षेपित केला.)

- 1980 : भारतीय बनावटीचे प्रक्षेपक SLV-2 द्वारे रोहिणी हा उपग्रह पाहिल्यादा प्रक्षेपित
- 22 ऑक्टोबर 2008: चंद्रयान-1 मोहीम यशस्वी.
- 24 सप्टेंबर 2014: मार्स ऑर्बिटर मिशन (MOM) ने यशस्वीरीत्या मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश केला.

## नागालँडमध्ये अफ्स्पाला 6 महिन्यांची मुदतवाढ

- केंद्र सरकारने नागालँडमध्ये राज्यातील सशस्त्र दल विशेषाधिकार कायदा 1958 (अफ्स्पा) चा कालावधी 6 महिन्यांनी वाढवला आहे.
- आता नागालँडमध्ये जुलै 2020 पर्यंत अफ्स्पा अस्तित्वात राहील.

**अफ्स्पा कायदा**

- AFSPA : Armed Force (Special Powers) Act 1958
- सशस्त्र दल विशेषाधिकार कायदा 1958 अर्थात अफ्स्पा लष्कराला जम्मू काश्मीर आणि ईशान्य भारतातील अशांत भागात विशेषाधिकार देतो.
- या कायद्याद्वारे कोणत्याही क्षेत्रामध्ये धार्मिक, वांशिक, भाषिक विवाद झाल्यास राज्य किंवा केंद्र सरकारद्वारे त्या क्षेत्रास अशांत घोषित केले जाऊ शकते.
- अफ्स्पाच्या कलम 4 नुसार, सुरक्षा रक्षकांना कोणत्याही परिसराची तपासणी करण्याचे तसेच कोणालाही विना वॉरंट अटक करण्याचा अधिकार आहेत.
- यामुळे वादग्रस्त भागात सुरक्षा रक्षक कोणत्याही थराला जाऊन आपल्या ताकदीचा वापर करू शकतात.
- संशयास्पद स्थितीत त्यांना कोणत्याही वाहनाला रोखण्याचे त्यांची तपासणी करण्याचे तसेच त्यावर जप्ती आणण्याचा अधिकार आहे.
- 1958 मध्ये पहिल्यांदा ईशान्य भारतात बंडखोरांशी मुकाबला करण्यासाठी संसदेत हा कायदा पारित करण्यात आला.
- सुरक्षा दलाच्या मतानुसार या कायद्यामुळे कठीण परिस्थितीत दहशतवादी किंवा इतर धोक्याशी लढणाऱ्या जवानांना कारवाईत सहकार्य मिळण्याबरोबरच सुरक्षाही मिळते.
- मणिपूरमधील अफ्स्पा हटवण्याच्या मागणीसाठी इरोम शर्मिला यांनी 16 वर्षे उपोषण केले होते. त्यांना मणिपूरची आयर्न लेडी असे संबोधले जाते.
- सध्या देशामध्ये 5 राज्ये व 2 केंद्रशासित प्रदेशांमध्ये अफ्स्पा कायदा चालू आहे : आसाम, नागलँड, मेघालय, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, लडाख

## तेलंगणा सरकारचे कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष

- तेलंगणा सरकारने 2020 हे वर्ष कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या वर्षी तेलंगणा सरकार कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित विविध कार्यक्रम राबविणार आहे.
- निती आयोगाने 'AI फॉर ऑल' नावाचे दस्तऐवज तयार केले या दस्तऐवजावर स्वाक्षरी करणारे तेलंगणा हे पहिले राज्य होते.
- नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर्स अँड सर्व्हिसेस कंपनीज) हैदराबाद (तेलंगणा) येथे डेटा सायन्सेस अँड एआयमधील उत्कृष्टता केंद्र उभारणार आहे.
- आयआयटी खरगपूर तेलंगणा सरकारच्या सहकार्याने हैदराबादमध्ये विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण देण्याकरिता प्रादेशिक केंद्र स्थापित करणार आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता:**

- AI - Artificial Intelligence
- कृत्रिम बुद्धिमत्ता ही संगणक शास्त्रातील महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्र शिक्षण, त्यांचे बुद्धिमान वर्तन आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता आदींचा अभ्यास केला जातो.
- या शाखेतील संशोधन मुख्यतः स्वयंचलित कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी बुद्धिमान वर्तणूक करू शकतील अशा यंत्राशी निगडित आहे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता असणाऱ्या प्रणाली अर्थशास्त्र, आरोग्य, विज्ञान, अभियांत्रिकी, संरक्षण संगणकीय खेळ आणि संगणक प्रणाली यामध्ये वापरल्या जातात.

## व्हिडिओ के. वाय. सी. करणारा भारत जगातील एकमेव देश

- व्हिडिओ KYC करणारा भारत हा जगातील पहिला व एकमेव देश ठरला आहे. मोबाईल व्हिडिओ संवादाद्वारे 'नो युवर कस्टमर' अर्थात KYC प्रक्रिया राबवण्यास बँका व फिनटेक कंपन्यांना रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली आहे. त्यासाठी नियमात बदल केले गेले आहेत.
- आधार कार्ड व इतर इ-दस्तवेजांआधारे इ-KYC व डिजिटल KYC राबवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली आहे.
- सरकारने मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा, 2002 मध्ये दुरुस्ती केली असून, बँकेने KYC विषयक नियमांत बदल केले आहेत.
- बँक नवे ग्राहक जोडण्यासाठी ॲपच्या माध्यमातून व्हिडिओद्वारे, तसेच आधार व पॅन प्राप्त करून KYC प्रक्रिया राबवू शकतील.
- बिगर बँक संस्थाना ई- KYC ची परवानगी नाही. मात्र, प्रत्यक्ष आधार व QR कोडच्या माध्यमातून त्यांना KYC प्रक्रिया राबवता येईल. आधाराद्वारे इ-KYC प्रक्रिया राबविण्यास कोर्टाने मनाई केल्यानंतर नवीन ग्राहक जोडणे मोबाईल वॉलेट कंपन्यांना कठीण झाले होते.
- RBI ने जाहीर केले की, डिजिटल KYC म्हणजे ग्राहकाचा लाईव्ह फोटो घेणे व आधार असल्याचा वैध अधिकृत पुरावा घेणे. जिथे ऑफलाइन पडताळणी शक्य नाही, तिथे व्हिडिओ KYC राबविता येईल. अधिकृत अधिकारी लाइव्ह फोटो घेतील.
- जेथे फोटो घेतला, त्या स्थानाची अक्षांश-रेखांशासह नोंद घेतली जाईल.

## आंध्रप्रदेशमध्ये अम्मा वोडी योजना जाहीर

- आंध्रप्रदेश सरकारने महिला व बालकांच्या विकासासाठी महत्वपूर्ण अशी अम्मा वोडी योजना जाहीर केली आहे. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनी दारिद्र्य रेषेखालील महिलांसाठी ही योजना जाहीर केली आहे.
- या योजने अंतर्गत ज्यांची मुले शाळेत शिकत आहेत अशा गरीब महिलांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. या महिलांच्या खात्यात वर्षाला 15 हजार रुपये देण्याची सरकारची योजना असून ही रक्कम वर्षाच्या सुरुवातीलाच जानेवारी महिन्यात लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा केली जाणार आहेत .
- जोपर्यंत मुलाचे शालेय शिक्षण पूर्ण होत नाही, तोपर्यंत ही मदत दिली जाणार आहे. या योजनेमुळे गरीब महिलांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठी आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

## इंटरनेट सेवेचा वापर हा मूलभूत अधिकार

- भारतीय राज्यघटनेतील भाग 3 मधील कलम 19 नुसार इंटरनेट सेवेचा वापर हा नागरिकांचा मूलभूत हक्क असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.
- न्यायालयानुसार इंटरनेट सेवा या अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा भाग आहेत व त्या सविस्तर कारण दिल्याशिवाय बंद करता येत नाहीत.
- यापूर्वी केरळ उच्च न्यायालयाने इंटरनेट हा मूलभूत अधिकार असल्याचे जाहीर केले होते.

## बिहारमध्ये कासव पुनर्वसन केंद्र

- बिहारमधील भागलपुरच्या जंगलात जानेवारी 2020 रोजी कासव पुनर्वसन केंद्र सुरू होणार आहे.
- या केंद्राचे क्षेत्रफळ सुमारे अर्धा हेक्टर असून हे केंद्र 500 हून अधिक कासवांना आश्रय देईल.
- तस्करांकडून वाचविण्यात आलेल्या गंभीर आणि जखमी कासवांचे घर म्हणून पुनर्वसन केंद्र कार्य करेल.
- अशा प्रकारचे हे देशातील पहिलेच कासव पुनर्वसन केंद्र असेल.
- सध्या असे केंद्र नसल्यामुळे वाचविण्यात आलेल्या कासवांना नदीमध्ये सोडण्याआधी वनाधिकारी त्यांचे परीक्षण करू शकत नव्हते. परंतु पुनर्वसन केंद्र ही समस्या सोडविण्यास मदत करेल.
- भागलपुर मधील गंगा नदीत पुरेसा पाण्याचा प्रवाह आहे. या प्रदेशात असंख्य वाळूचे किनारे आहेत, जे कासवांसाठी उत्कृष्ट प्रजनन प्रदेश म्हणून काम करतात.
- तसेच या प्रदेशातील कासवांचे सरासरी वजन 15 किलो ग्रॅम पर्यंत आहे आणि येथे कासवांची तस्करी मोठ्या प्रमाणात होते.
- स्वच्छ गंगेसाठी राष्ट्रीय मिशन आणि भारतीय वन्यजीव

संस्था यांच्या अहवालांनुसार, धरणे व बंधारे बेकायदेशीर शिकार, मासेमारीच्या जाळ्यामध्ये चुकून अडकणे, प्रदूषण यांसारख्या घटनांमुळे येथील कासवांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

- त्यामुळे अशा धोक्यात आलेल्या कासवांना वाचविणे आणि सुरक्षितपणे नदीत परत सोडणे आवश्यक आहे.
- ट्रॅफिक इंडियाच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे 11 हजार कासवांची भारतातून तस्करी केली जाते.
- त्यांच्या मांसासाठी त्यांना लक्ष केले जाते कारण कासवाचे मांस हे शक्तिवर्धक आहे आणि ते रोगांना देखील दूर ठेवते.
- हार्ड-सेल कासवांची त्यांना पाळण्यासाठी शिकार केली जाते. चीन जपान व दक्षिण पूर्व आशियामध्ये त्यांची जास्त मागणी आहे.

## प्रियदर्शनी गोविंद यांना नृत्य कलानिधी पुरस्कार

- भरतनाट्यम् शैलीतील नृत्यांगना प्रियदर्शनी गोविंद यांना 3 जानेवारी रोजी मद्रास अकादमीमध्ये सुरू असलेल्या 14 व्या नृत्य महोत्सवात नृत्य कलानिधी पुरस्काराने गौरविण्यात आले.
- प्रियदर्शनी गोविंद यांना यापूर्वी संगीत नाटक कला अकादमी पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे.

**भरतनाट्यम् :**

- भरतनाट्यम् ही एक अभिजात दक्षिण भारतीय नृत्यशैली आहे. या शैलीचा उगम दक्षिण भारतातील मंदिरांमध्ये (तामिळनाडू प्रांतात तंजावर येथे) झाला.
- ही नृत्यशैली भरतमुनींच्या नाट्यशास्त्रावर आधारित आहे.
- भरतनाट्यम्चे सादरीकरण कर्नाटकी संगीताच्या बरोबरीने होते.
- या नृत्यशैलीवर द्रविड संस्कृतीचा प्रभाव आहे. यात मृदंगम्, तालम्, घटम्, बासरी, वीणा या वाद्यांची साथ असते.
- चेत्रया पोत्रया शिवानंद आणि वडिवेल या तंजावर बंधू संगीतकारांनी या नृत्याचा मार्ग रचला आणि त्याच क्रमाने आजही नृत्य प्रस्तुती करण्याची पद्धत आहे.
- सुरुवातीला मंदिरात केली जाणारी ही कला नंतर राजदरबारात आणि रंगमंचावर सादर केली जाऊ लागली.
- भाव, राग आणि ताल ही भरतनाट्यम्ची तीन मुख्य अंगे असतात. या तीन अंगाच्या आद्याक्षरांवरून भरतनाट्य नाव पडले असा एक प्रवाद आहे.

## मिलन 2020

- मार्च महिन्यामध्ये भारतात मिलन (MILAN) नावाचा जगभरातल्या नौदलांचा वार्षिक आंतरराष्ट्रीय सराव होणार आहे.
- सिनर्जी अक्रॉस द सीज या विषयाखाली यंदाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**महत्त्वाचे :**

- हा सराव विशाखापट्टणम् येथे आयोजित केला जाईल. यापूर्वी फेब्रुवारी 2016 मध्ये हा सराव विशाखापट्टणम् येथे आयोजित करण्यात आला होता.
- या कार्यक्रमामुळे परदेशी नौदलांसोबतचे मैत्रीपूर्ण संबंध आणखी वृद्धिंगत करण्यास वाव मिळतो.
- हा कार्यक्रम व्यावसायिक संबंध वाढवण्याच्या उद्देशाने आणि सागरी क्षेत्रामधील एकमेकांचे सामर्थ्य आणि उत्कृष्ट पद्धतींमधून शिकण्याच्या उद्देशाने आहे.

**मिलन :**

- बहुपक्षीय नौदल सराव
- 1995 साली पहिल्यांदा आयोजित
- भारतीय नौदलाकडून अंदमान व निकोबार कमांडच्या अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन.
- यंदा सरावाचे ठिकाण विशाखापट्टणम् येथे.

## हर्षवर्धन सदगीर महाराष्ट्र केसरी 2019

- नाशिकचा कुस्तीपटू हर्षवर्धन सदगीर 2019 चा महाराष्ट्र केसरी ठरला. असा किताब जिंकणारा तो 44 वा मल्ल ठरला आहे.
- 2019 ची ही 63 वी कुस्ती स्पर्धा होती.
- स्पर्धेचे ठिकाण - बालेवाडी, पुणे.
- उपविजेता - शैलेश शेळके, लातूर.

**वर्ष व महाराष्ट्र केसरी विजेते :**

- 2018 - बाला रफीक
- 2017 - अभिजित कटके

- 2014 ते 2016 – विजय चौधरी
- 1961 (पहिला विजेता) – दिनकर पाटील

**स्पर्धेविषयी :**

- स्पर्धेची सुरुवात : 1961
- विजेत्यांना 1982 पासून चांदीची गदा तर 2008 पासून चांदीची गदा व काही रोख रक्कम दिली जाते.

## 9 जानेवारी : प्रवासी भारतीय दिन

- 9 जानेवारी 1915 रोजी महात्मा गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले म्हणून 9 जानेवारी हा प्रवासी भारतीय दिन म्हणून साजरा केला जातो.
- 2003 साली पहिला प्रवासी भारतीय दिवस नवी दिल्ली येथे आयोजित केला गेला.
- 2016 मध्ये काही कारणास्तव या दिनाचे आयोजन करण्यात आले नव्हते.
- 2018 चा प्रवासी भारतीय दिवस सिंगापूर येथे आयोजित केला गेला.
- 2019 चा प्रवासी भारतीय दिवस वाराणसी येथे आयोजित करण्यात आला होता. गेल्यावर्षी पहिल्यांदाच प्रवासी भारतीय दिवसांचे आयोजन 9 जानेवारीऐवजी 21 जानेवारी ते 23 जानेवारी या काळात केले गेले.
- थीम – Role of Indian Diaspora in building New India

**उद्दिष्टे :**

- अनिवासी भारतीय नागरिकांच्या भारताच्या प्रगतीमधील योगदानासाठी
- त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
- जगभरातील भारतीय प्रवाशांचे नेटवर्क तयार करणे व गुंतवणूक वाढवणे.

**महत्त्वाचे :**

- भारतातील अकुशल कामगारांचा देशनिहाय उतरता क्रम : यूएई, सौदी अरब, कुवेत
- उत्तर प्रदेश, बिहार व तमिळनाडू या राज्यांतून सर्वाधिक अकुशल कामगार इतर देशांमध्ये जातात.

**देश व भारतीयांची संख्या (लाखांमध्ये)**

- अमेरिका – 46
- युएई – 31
- मलेशिया– 29

## 10 जानेवारी : जागतिक हिंदी दिवस

- 1975 मध्ये नागपुरात पहिली जागतिक हिंदी परिषद भरवली गेली. त्यामुळे दरवर्षी 10 जानेवारी रोजी जागतिक हिंदी दिवस साजरा केला जातो.
- सर्वप्रथम 2006 साली पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी जागतिक हिंदी दिवसाची सुरुवात केली.

**उद्दिष्टे :**

- हिंदीच्या प्रसारासाठी जागरूकता निर्माण करणे
- हिंदीला जागतिक भाषा म्हणून सादर करणे व आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून ओळख देणे.

**महत्त्वाचे :**

- नॉर्वेतील भारतीय दूतावासाने पहिला जागतिक हिंदी दिन साजरा केला.
- 10 जानेवारी हा जागतिक हिंदी दिन तर 14 सप्टेंबर हा हिंदी दिन म्हणून साजरा केला जातो कारण 14 सप्टेंबर 1949 रोजी भारतीय संविधान सभेने हिंदीला अधिकृत भाषेचा दर्जा दिला होता .
- भारतीय घटनेच्या 8 व्या परिशिष्टात एकूण 22 भाषा आहेत त्यात हिंदीचा समावेश होतो .
- फिजी मध्ये हिंदीला अर्ध्या अधिकृत भाषेचा दर्जा प्राप्त आहे.
- तसेच हिंदी जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी पहिल्या पाच मध्ये आहे.
- भारतात जवळपास 55 कोटी लोक हिंदी बोलतात त्यापैकी 26 कोटी लोकांची ही मातृभाषा आहे.
- वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या गणनेनुसार हिंदी ही जगातील दहा शक्तिशाली भाषांपैकी एक आहे.

**जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांचा उतरता क्रम**

1) मँडरीन (चीन)
2) इंग्लिश
3) हिंदी

**भारतात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांचा उतरता क्रम**

1) हिंदी (43.63%)
2) बंगाली (8.03%)
3) मराठी (6.86%)
4) तेलुगू (6.70%)

## ठळक घडामोडी

- फास्टर अडॉप्शन अँड मनुफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रिक व्हेइकल्स इंडिया स्कीम (FAME) - इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी.
- नागरिकत्व कायदा राबविणारे उत्तर प्रदेश पहिले राज्य.
- तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी नवीन उदयोन्मुख आणि धोरणात्मक तंत्रज्ञान (NEST) – परराष्ट्र मंत्रालयातला नवीन विभाग.
- 1917 : हा गोल्डन ग्लोब पुरस्कारातील सर्वोत्कृष्ट चित्रपट.
- एअर इंडियाच्या खाजगी करणास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.
- भारत - ओमान दरम्यान 'नसीम अल बहर' सागरी युद्धसराव.
- 31 वा आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सव : साबरमती, गुजरात.
- सहावे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन अलिबाग, रायगड येथे पार पडले.
- भारत आणि नेपाळ 'काला पानी' भूभागावरून विवाद.

चाणक्य मंडल परिवार